अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र.:- अतिमआ(ज)/साप्रवि/आस्था/२८६२
दिनांक :- २१/०६/२०२४

-: कार्यालयीन आदेश :-

विषय :- कर आकारणी व कर संकलन कार्यालयाकडील सर्वेक्षण विषयक कामकाजासाठी अतिरिक्त कर्मचारी उपलब्ध करून देणेबाबत.

संदर्भ :- १) मा. महापालिका आयुक्त, ठराव क्र.६/१२८, दि.११/०६/२०२४
२) मा. महापालिका आयुक्त, ठराव क्र.१/४६, दि.२०/०६/२०२४

पुणे महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन कार्यालयाकडील PT-३ फॉर्म च्या अनुषंगाने मिळकतींचे प्रत्यक्ष जागेवर जाऊन तपासणी / सर्वेक्षण करणेच्या कामासाठी अतिरिक्त कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देणेसाठी मा.महापालिका आयुक्त यांची संदर्भ क्र. १ व २ चे ठरावाने मंजुरी प्राप्त झालेली आहे.

सदर प्रकरणी प्राप्त मंजुरीचे अनुषंगाने पुढीलप्रमाणे कार्यवाही करावयची आहे.

१) वरीलप्रमाणे कामकाज करणेसाठी अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभागाकडील ७५ सहाय्यक अतिक्रमण निरीक्षक, घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील १५० आरोग्य निरीक्षक आणि प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयाकडील ०५ मोकदम याप्रमाणे एकूण ७५ मोकदम असा कर्मचारी वर्ग संबंधित खातेप्रमुख यांनी पुढील आदेश होईपर्यंत कर आकारणी व कर संकलन विभागास उपलब्ध करून द्यावेत.

२) पुणे मनपाच्या विविध कार्यालयांकडे नियुक्तीस असलेल्या लिपिक टंकलेखक पदावरील ७५ कर्मचारी सामान्य प्रशासन विभागाने पुढील आदेश होईपर्यंत कर आकारणी व कर संकलन विभागास उपलब्ध करून द्यावेत.

३) उप आयुक्त, कर आकारणी व कर संकलन विभाग यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना केवळ सर्वेक्षणाची जबाबदारी द्यावयाची आहे. कर आकारणी व कर संकलन विभागाचे नियमित वसुली विषयक कामकाज देऊ नये.

४) वरीलप्रमाणे सहाय्यक अतिक्रमण निरीक्षक, आरोग्य निरीक्षक आणि मोकदम पदावरील कर्मचाऱ्यांनी त्यांचेकडील नियमित कामकाज करून सदरचे तपासणी / सर्वेक्षण विषयक कामकाज करावायचे आहे.

५) लिपिक टंकलेखक पदावरील सेवक हे पूर्णवेळ कर आकारणी व कर संकलन विभागाकडे तपासणी / सर्वेक्षण विषयक कामकाजासाठी उपस्थित राहतील.

६) वरीलप्रमाणे कर्मचाऱ्यांची यादी सर्व संबंधित खातेप्रमुख यांनी कर आकारणी व कर संकलन विभागाकडे आणि सामान्य प्रशासन विभागाकडे दि.२१/०६/२०२४ रोजी कार्यालयीन वेळेपूर्वी सादर करावी.

७) वरीलप्रमाणे नमूद बाबींचे अनुषंगाने सदरचे सर्वेक्षण विषयक कामकाजासाठी संबंधित कर्मचारी दि.२४/०६/२०२४ रोजी कर आकारणी व कर संकलन विभागाकडे हजर होतील अशा प्रकारे संबंधित खातेप्रमुख यांनी कर्मचाऱ्यांना त्यांचे स्तरावरून आदेशित करावे.

८) वरीलप्रमाणे सर्वेक्षण विषयक कामकाजाचा साप्ताहिक अहवाल उप आयुक्त, कर आकारणी व कर संकलन विभाग यांनी मा.महापालिका आयुक्त यांचेकडे सादर करावयचा आहे.

तरी, संबंधीत खातेप्रमुख यांनी जरुर ती पुढील तजविज करावी.

Ravt
(रविंद्र बिनवडे)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका
20/6/2024

प्रत :-
१) सर्व संबंधीत खातेप्रमुख,
२) सर्व महापालिका सहाय्यक आयुक्त
पुणे महानगरपालिका
यांजकडे माहिती व पुढील तजविजीसाठी --